''भाषा हे सर्वश्रेष्ठ संदेशनमाध्यम आहे, तसेच संस्कृतीचे मूलभूत अंगही आहे. बदलत्या जीवनधारणा, आत्मिक–भौतिक व्यवहारातील परिवर्तने, सांस्कृतिक संक्रमणे भाषाव्यवहारांतही उमटत असतात.

येथे समकालीन भाषाव्यवहारांचे स्वरुप, भाषेच्या व्यवहारी उपयोजनाचे स्वरुप चिकित्सकदृष्टीने अनुभवणे असा ज्ञानसंवाद अनेकमुखी प्रतिभा करीत आहेत. जागतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेत स्थानिक भाषा–बोलीभाषा भोवंडून निघत आहेत. भाषासंमिश्रण, भाषासंपर्क, भाषासंक्रमण आणि भाषाअंतभय अशी समकालीनता जाणवत आहे. भाषा–कार्यांची अभिव्यक्ती तांत्रिक किंवा औपचारिक स्वरुप धारण करीत आहे. ज्ञानभाषा म्हणून स्थानिक भाषांची पात्रता, लोकजाणिवा, बहुसांस्कृतिकता, बहुभाषिकता यांच्या अनुरोधाने प्रश्न निर्माण होत आहेत. संवाद, वि–संवाद आणि मौनाचा अर्थ उलगडण्याची ही समकालीन 'स्थिती' आहे''

आयडॉल पब्लिकेशन्स, पुणे.
ISBN : 978-93-85072-91-8

समकालीन भाषाव्यवहार

ISBN: 978-93-85072-91-8

# समकालीन भाषाव्यवहार

संपादक
अेकनाथ पगार
जयवंत भदाणे

**समकालीन भाषाव्यवहार**
संपादकः डॉ.अेकनाथ पगार
डॉ.जयवंत भदाणे

**Samkalin Bhashavyavhar**
Sampadak: Dr. Eknath Pagar
Dr. Jaywant Bhadane

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

**प्रकाशकः**
आयडॉल पब्लिकेशन्स,
६३१/६३२, शान ब्रह्मा कॉम्प्लेक्स,
अप्पा बळवंत चौक, बुधवार पेठ,
पुणे-४११००२. मो.९८२३६१९२३४
Email:idol.books@gmail.com

© संपादक

**मुद्रणस्थळः**
इमेज ऑफसेट, सर्व्हे नं.१०/१/१,
धायरी गाव, पुणे- ४११०४१.

**अक्षरजुळणी/मांडणीः**
प्रा.डॉ.जयवंत भदाणे
९४२३२५५४५०

**पहिली आवृत्तीः**
२४ मार्च २०१७ (एकादशी)

**मुखपृष्ठ :**
रामा सरमाळकर, पुणे
किंमतः ३०० रुपये.

**ISBN: 978-93-85072-91-8**

# ||अनुक्रमणिका ||

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani


- प्रस्तावना
- संपादकीय

१ समकालीन भाषाव्यवहारः भाषासंमिश्रण आणि भाषासंकर - डॉ. नंदकुमार मोरे १

२ माहितीपर साहित्यः भाषावापर - प्रा. गजानन भामरे २४

३ भाषिकआदानप्रदानः कार्यस्थळ- डॉ. वीणा माळी ३५

४ देशी भाषांची ज्ञान संप्रेषण क्षमता- डॉ. प्रकाश शेवाळे ४१

५ जागतिकीकरणाचा भाषा संस्कृतीवरील परिणाम - प्रा. सखाराम कदम ४९

६ भाषाः बालकांची आणि बालसाहित्याची- प्रा. विद्या सुर्वे-बोरसे ६०

७ मानवी हक्क आणि भाषाव्यवहार - प्रा.गायत्री राजू सोनवणे ६७

८ भाषांतर, माध्यमे आणि मराठीची समकालीनता - डॉ.दीपक बोरगावे ७३

९ बंजारा बोलीचा कार्यक्षेत्रीय अभ्यास - प्रा.व्ही.बी.राठोड ९५

१० अग्रलेखांची भाषा - अेकनाथ पगार ११०

११ मोबाईलः भाषावापर - जयवंत भदाणे १३८

१२ आदिवासी बोली आणि समकाल - प्रा.हेमराज बिरारीस १४५

१३ कार्यात्मक मराठी भाषाः विचारसूत्रे - प्राचार्य डॉ.दिलीप धोंडगे १४९

१४ प्रशासकीय मराठी - प्राचार्य डॉ.भाऊसाहेब गमे १५५

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

# ५ जागतिकीकरणाचा भाषा संस्कृतीवरील परिणाम

सखाराम बाबाराव कदम

भारताने १९९० नंतर 'खाऊजा' धोरणाचा स्वीकार केला मुक्त अर्थव्यवस्था,खुली बाजारपेठ, सेझ या संकल्पनांचे वारे येथे वाहू लागले.नवनवीन ज्ञानशाखांचा झालेला उदय व प्रसार झपाट्याने वाढला. नवीन ज्ञान विज्ञानाचा परिचय होऊन त्या - त्या क्षेत्रातील अनेक नव्या संज्ञा, संकल्पना येथे रुढ झाल्या भाषिक आदानप्रदानही वाढले. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगाने माणसाचे जगणे अधिक एकलकोंडे बनवले. त्याच्या भाव भावना, विचार अभिव्यक्तीचे माध्यम असलेली भाषाही यातून सुटली नाही. या भाषेने कधी भाषिक गरज म्हणून, कधी नव्या संज्ञा म्हणून तर कधी आपल्या आशयसंपन्नतेत भर घालण्यासाठी म्हणून वेगवेगळ्या भाषेतील शब्द, नवा संकेत व्यक्त करणाऱ्या संकल्पना, भाषिक लकबी , स्वीकारल्या यातूनच समकालीन भाषाव्यवहार हा भाषा संमिश्रणाचा व भाषासंकराचा काळ म्हणून ओळखला जाऊ लागला.

आज जग एक खेडे बनत चालले आहे. आपण या 'ग्लोबल व्हिलेज' चे नागरिक म्हणून वावरत आहोत. असे असतांना आपली भाषा या झंझावातातून सुटणे कठीण आहे. म्हणून भाषेने अभिव्यक्तीचे माध्यमरुप म्हणून केवळ न राहता माणसाच्या मनातील भाव भावना, विचार यांचे नव्या संदर्भासह व्यक्त होणे महत्वाचे मानले आहे. म्हणूनच कुठलीही भाषा आज शुध्द स्वरुपात उपलब्ध नाही. प्रत्येक भाषेने इतर भाषेतील अनेक शब्दांचा खुबीने उपयोग करुन आपल्यातील उणिवा बाजूला फेकल्या. दुसऱ्या भाषेतील

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

[illegible] अन्वर्थक ध्वनी स्वीकारले व यातून कळत - नकळपणे भाषासंमिश्रण होत राहिले. महानगरामधून तर या भाषासंकराला व्यापक रुप लाभले. कॉन्व्हेंटमधून शिकणारी मुले आपापसात चर्चा करतांना 'मराठी वर्ड रिडींगला अन् रायटींगला डिफिकल्ट असतात' अस म्हणू लागली. दळणवळणाची वाढलेली साधने, टी.व्ही. मोबाईल, कॉम्प्यूटर, व्हिडिओ इत्यादींच्या वाढत्या वापरामुळे तर भाषेवर असे भाषासंकराचे उपकारक संस्कार झाल्याचे दिसते. आज गावखेड्यापर्यंत केबल कनेक्शन, DTH, विभिन्न चॅनेल्स पोहोचले. गावच्या जिल्हा परिषद शाळेत शिकणारी मुले छोटा भीम पाहून हिंदी बोलू लागताहेत. तर डिस्ने, किड्स फन, सारख्या चॅनेल्स वरुन ते या आभासी वास्तवाला थेट भिडत आहेत. मोबाईलने तर या संवादाच्या अनेक शक्यता सहजपणे खुल्या केल्या. वेगवेगळ्या सोशल साईट (फेसबुक, व्हॉटसअॅप, ट्वीटर) वरुन चालणारी तासनतास चॅट्ींग जर कधी नजरेसमोर आली तर या भाषा संकराने आपण अवाक झाल्याशिवाय राहणार नाही. 'J1झालं का.?' असं विचारणारी बायको असुद्या किंवा 'पप्पा स्कूलमध्ये आज मॅमनी आम्हाला मराठी पोएम शिकवली' म्हणणारी मुलगी असू द्या. या भाषावापराने आपल्याला वेढले आहे.

१९९० नंतर जागतिक स्तरावरील व्यापार, अर्थकारण, राजकारण दहशतवाद यासारख्या घटकांशी ग्रामीण माणसाचे जगणे - मरणे, विचार करणे वा गप्प राहणे नियंत्रित झाले. जग हीच मुक्त बाजारपेठ असून आपण या ग्लोबल व्हिलेजचे नागरिक व ग्राहक आहोत अशी मनोमन माणसांची खात्री पटली. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येणारी सत्ताकांक्षा त्यासाठी करावे लागणारे विधिनिषेध शून्य न - नैतिक राजकारण त्यातून उद्भवणारे अराजक, वाढता मूलतत्ववाद यासारख्या जागतिकीकरणाच्या साईड इफेक्टस् स्वीकारुन हा माणूस या गोंधळाच्या विस्कळीत झालेल्या झालेल्या नव्या वास्तवाला भिडू

पाहतोय. तो यासाठी कधी कवितेचा, तर कधी कथेचा हात धरतो. १९९० नंतर मात्र प्रकर्षाने कविता अधिक लिहीली जाऊ लागल्याचे दिसून येते. आपल्या गावाविषयी, मातीविषयी , शेतकऱ्यांविषयी प्रेम व आपुलकी ची भावना कमी करण्यामध्ये सिंहाचा वाटा राजकारणाचा आहे. गावागावात आज राष्ट्रीय पक्षांच्या शाखा येऊन धडकल्या. एकाच घरातील माणसं वेगवेगळ्या राष्ट्रीय,प्रादेशिक पक्षांचे सभासद झाले. यामुळे समूहभावनेला तडा गेला.या राजकीय पक्षांनी जातीय भावना टोकदार बनविल्या याचेचं वर्णन-

"गावाच्या फाट्यावर बारा बारा पाट्या
राजकारणाचा भर मनावर थोट्या
उतू आल्या संघटना जाती - जातीतून
उगवती काळया काट्या गाव - मातीतून
गल्ली बोळातून सारे विभागले जन
दुरिताचा वारा वाहे कोरा भणभण ..." (०१)

समूहभावनेने जगणारे गाव छोट्या छोट्या गोष्टींना आस्मितेचा प्रश्न बनवून नातलगांना एकामेकांविरोधात उभे करु लागले.कोर्ट कचेऱ्या वाढल्या. पोलीस व वकिलांकडे ये- जा वाढली खून हाणामाऱ्या, जाळपोळ, दंगली नित्यांच्या बनल्या. या सर्व अस्थिरतेमुळे सामान्य माणसाचे जगणे नासवले गेले. शासकीय स्तरावरुन 'खाऊजा' चा जरी स्वीकार झाला तरी गावातल्या जुन्या पिढीतील शेतकऱ्याचा प्रश्न आपल्या नातवाकडे काय असतो. पहा. -

" हा गॅट करार म्हणजे काय आस्ते बाबा ?
अन् जागतिकिरणाचं वारं कसं आस्ते ?
कसा वास येते त्या वाऱ्याचे ?
बल्डाखालच्या पांदीसारखा
का कणग्यात बुडी लागल्या आंबूस गव्हासारखा ? " (०२)



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Parbhani

नवनवीन शासकीय धोरणामुळे हैराण सोनबा म्हतारा जेव्हा घशातील बेडके फेकत तरण्या राजाला हा प्रश्न विचारतो तेंव्हा वाचकही अंतर्मुख झाल्याशिवाय राहत नाही. शिक्षणाचे वाढते अवास्तव स्तोम व तरीही शेतकऱ्याच्या आत्महत्यांमध्ये झालेली लक्षणीय वाढ नजरेत भरते. शेतीतील वाढत्या यांत्रिकिकरणाचा न परवडणारा खर्च, लेकरांच्या शिक्षणासाठी लागणारी वाढती फी, इंग्रजी शिक्षणाच्या हाव्यासामुळे होणारी फरपट यामुळे शेतकऱ्यांचे 'मरण सोपे जगणे अवघड बनले. हजारो शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपविली या परिस्थितीकडे ग्रामीण कवी कोणत्या भूमिकेतून पाहतो? प्रचलित वास्तवाचे तो कितपत आणि कसे आकलन करतो? हे शोधताना नारायण कुलकर्णी कवठेकर लिहीतात.'

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth. Dist. Parbhani

"अस्मानी जाईल, तर सुल्तानी खाईल
तहसिलीतून सुटशील तर कोर्टात अडकशील
जनावरानं सोडलं तर माणसं फाडतील
टाकांच्या निफांनी तुझी कणसं खुडतील." (०३)

अशा कुठल्या ना कुठल्या एका तरी चक्रात हा शेतकरी निश्चित अडकून पडले अशी परिस्थिती सभोवार घोंगावत आहे. या स्थितीबद्दल देवानंद सोनटक्के 'सिझर कर म्हणतेयं माती' या काव्यसंग्रहाच्या ब्लर्ब मध्ये लिहितात." नव्या शहरी संस्कृतीचे आक्रमण गावापर्यंतच नव्हे तर उपजाऊ शिवारापर्यंत झाले आहे. हरितक्रांतीतून पैसा हाती आला, मात्र संस्कृती आणि नातेसंबध दुरावले. अडाणी शेतकऱ्याला सेंद्रिय शेतापासून दूर नेऊन रासायनिक शेतीकडे वळवले... शहरीकरण, गावाचे भकासपण, माणसांचे आंधळेपण, विकासाच्या नावाखाली शोषण आणि पुनर्वसनाची बोंब असे शेतकऱ्यांचे जगणे चहुबाजुंनी मुश्किल झाले आहे. एकदंर या आधुनिक जाणिवेने मानवी एकात्म भावना विखंडीत केल्या आहेत." आधुनिक संस्कृतीने शेती - ग्रामीण संस्कृतीचे हे जे

अध:पतन केले आहे त्याचा तीव्र विरोध करुन त्याचा अस्सल काव्यात्म परामर्श आजची कविता घेताना दिसते.

"तुझ्या पिढ्यानपिढ्यांचा,दाबून कोळसा पडला
आणि पेटला पण वेळोवेळी, त्यांच्या चुल्हयासाठी
त्यांच्या गुणवत्तेनं, लावल्या पोथ्या पढायला
अशी,आपल्या अवकळेची बात
पिढी पेस्तर प्यादेमात
दरपिढीत केलं गारद, कधी नडला वामन कधी नारद
कधी हपिसातले बाबू तर कधी गल्लीतले खाबू
कधी व्याजधरु शेटजी कधी पोटभरु भटजी "

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

ह्या अशा असंख्य जळवांनी कास्तकाराचे जगणे नागवले व नासवलेसुध्दा. जागतिकीकरणामुळे चंगळवाद बोकाळला. उपभोगाची प्रवृत्ती वाढीस लागली. यात शेतकरी आपल्याच माणसांकडून बुटाच्या लाथा खाऊ लागला. जमिनी विकण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय राहिला नाही. पण येथल्या प्रत्येक कवींचं संवेदन वर्तमान वास्तवाला सहज सामोरं जाणारं आहे. त्याला कुठेही तडा गेलेला दिसत नाही. कुणबीक बेभरवशाची झाल्यावर गावालाजी उभी आडवी भेग जाते तिचा सर्जक पातळीवरुन, वेध घेण्यासाठी 'गावाच्या आकाभोवती' (प्रकाश किनगावकर), ' आवानओल ', ( अजय कांडर) 'चालणारे अनवानीपाय', (केशव देशमुख), 'कोरडे नक्षत्र'(प्रकाश होळकर), ' अंतरीचा भेद' (प्रदीप पाटील), 'टाहो' (इंद्रजित भालेराव), 'मेलंनाही अजून आभाळ ' (बालाजी मदन इंगळे), ' खुंट्यावर टांगलेली दु:ख' (एकनाथ पाटील), 'शरणागताचे स्तोत्र' (शशिकांत शिंदे), 'पुस्तकात नसलेली पानं' (सुरेश शिंदे), 'सालोसाल' (केशव खटींग), 'होऊ दे रे आबादानी' (श्रीराम गोविंद गव्हाणे), 'भुईभोग',(संदीप जगताप), 'आषाढमाती' (श्रीकांत देशमुख), 'नामदेव शेतकरी

' (जगदिश कदम), 'कविता खेड्याच्या' (विनय अपसिंगकर), 'मातेरं' (अनिल पाटील) इत्यादी कवितासंग्रह हे जागतिकीकरणाचा भाषा व संस्कृतीवरील परिणाम स्पष्ट करणारे लक्षणीय कवितासंग्रह म्हणून पहावे लागतील. जागतिकीकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम स्पष्ट करणारी कविता म्हणून बालाजी मदन इंगळे यांच्या 'मेलं नाही अजून आभाळ' मधील कवितेकडे पहावे लागते. येथल्या 'बापाचं गणित' केव्हापासून चुकलेलेचं आहे. दारिद्र्याचं अन कष्टाचं कार्बन चढलेलं बापाचं आयुष्य नांगर व तिफणीने सुध्दा साफ होत नाही. त्याला पाऊस व हिरवेपणा साठवणारे 'मेमरी कार्ड' कुठेच मिळत नाही. त्याच्या डोक्यावर असंख्य मोबाईल कंपन्याच्या नेटवर्क्सचं जाळं असलं तरी त्याचं बायकोशी कम्युनिकेशन होत नाही.

बाप मात्र, बाजूच्याच तुकड्यात
खुरपणाऱ्या आईशी
दिवस - दिवस बोलू शकत नाही (०५)

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

ही खंत, रुखरुख वाचकांच्या मानाला पोखरत जाते. प्रत्येक पिकपाण्याला डोळ्यात साठणाऱ्या बापाच्या शेतात

" हळुवारपणे मातीची उलथापालथ करणाऱ्या
सर्जक हाताच्या जागी अमानुषपणे जमीन उकरणारा
जेसीबी यंत्राचा भयानक पंजा आला" (०६)

विहीरीऐवजी पायात रुतलेल्या काट्यासारखा बोअर रानाच्या छातीत घुसला, उत्पन्न वाढावं म्हणून रासायनिक खतं - औषधं आली हे सगळ अघोरी घुसल्यामुळे कोवळे कोंब फुटण्यापासून ते टपोऱ्या दाण्यापर्यंतचा प्रवास खडतर झाल्याचे कवीचे निरीक्षण आहे. येथला नायक 'फरक' शोधताना बापाने आपल्या दावणीला बैल बांधले व व्यवस्थेनं मात्र बापालाच बांधलेलं असणे सांगून जातो. समकालीन कवितेतून येणारी नातेसंबंधातील पडझड, मानवाची

संवेदनहिनता वाचक रसिकाला अस्वस्थ करुन सोडते. हा सुध्दा जागतिकीकरणाचा एक परिणाम म्हणून पहावे लागते. श्रावणबाळाच्या, पुंडलिकाच्या कथेच्या माध्यमातून मायबापाच्या भक्तीचे गोडवे गाणारा हा मराठी माणूस आज मात्र कृतघ्न होताना पाहून मन विदीर्ण होते. यादृष्टीने जयराम खेडेकरांच्या 'मेघवृष्टी'तील वरील राधामाय व एकनाथ पाटलांच्या 'खुंट्यावर टांगलेली दु:खं ' मधील 'तारु मावशी' ह्या दोघींही मुलापासूनचे उपेक्षित जगणे कसेबसे जगत आहेत.

'बाबा, तूच सांग
रानातले किडे मारायला पाचशे रुपये किलूच इख मिळतं
घरातील माणसं जगवायला
तुमच्याकडं पैसे नाहीत व्हय' (०७)

हा सरळ प्रश्नचं वाचकाला निरुत्तर करतो. संवेदनशील माणूस ह्या बधिरीकरणाच्या प्रक्रियेमुळे हादरतो. या राधामायीच्या संपलेल्या गोळ्यांपुरते पैसे नाहीत म्हणणारा मुलगा केशव कापसावरील फवारणी मात्र करतो व आरोपीच्या पिंजऱ्यात स्वत: ऊभा राहतो, ही जाणीव अस्वस्थ करते.

एकनाथ पाटलांच्या 'खुट्यावर टांगलेली दु:खं' कवितासंग्रहातील 'तिला खोलवर गलबलून येते आतून' ही कविता असंख्य मार्यींचे दुखणे मांडते.

"बचारामंला शिकीवला हाडाची काड करुन
पर त्यो बी इसरला
आता म्हातारपणात एकटीच ऱ्हांते भुईला धरुन
एका येळा शिजवायचं आन दोन येळला खायाचं (०८)

नवऱ्यामाघारी तारुमावशीने हाडाची काडं करुन शिकवलेला बचाराम मात्र मतलबी बनतो. नाते विसरतो. प्रत्येक सुगीला गावावर येऊन मूठपसा दाणे शिल्लक ठेवून संगळी रोख रक्कम घेऊन जाणारा हा मुलगा कृतघ्न ठरतो.

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

तारुमावशीच्या डोळयातील दु:खाची सल नायकासह आपणासही अंतर्मुख करते. आपल्या आईला वचन देणारा हा बचाराम-

"जाताना म्हणातो, 'आई परत आल्यावर तुला ममईला नेतो'
भरली नदी वसारते
आताची कली आई - बाला कशी रं इसारते ?" (०९)

तारुमावशीचा प्रश्न अधिक गहिरा होतो, जेव्हा ती म्हणते की 'इतकी काय सोस्त असती माय' ही नातेसंबंधातील पडझड, व्यक्त करणारी ही जाणीव आहे. 'गावाचा पुरता झालाय नरक, पडला फरक माणसांमंदी' म्हणणारी ही जाणीव ठसठशीतपणे नजरेत भरते. निसर्गाच्या अवकृपेने सतत कास्तकार नागवला गेला. कधी अनावृष्टी तर कधी अतिवृष्टीने खंगलेल्या शेतकऱ्यांच्या जगण्याचे संदर्भ देणारी प्रकाश होळकरांची कविता 'कोरडं नक्षत्र' मधून भेटते.

उभ्या रचल्या सुडीला लागे उकीर आतून
किती सारवले तरी भुई खचते खालून
डोळा उन्हाचे कुसळ आणि झळाया रानाला
कोंब फुटण्याच्या आधी माती जाळते दाण्याला (१०)

शेतकऱ्यांचे स्वप्न उगवून येण्याअगोदरच करपून टाकणारा हा उन्हाळा जगणेचं नष्ट करतो. मरणाच्या सावटाखाली सतत उभा करतो.अशा बिकट दुष्काळाच्या वेळीही जगण्याविषयी आशावादी असणारी स्त्री प्रदीप पाटलांच्या 'अंतरीचा भेद' मध्ये आहे.

माती जशी सोसे
नांगराचा फाळ
तसे तिला बळ
झिजताना

असे जगणे महाग
करणारा आला काळ
तरी नाही दुभंगले
तिचे धरणीचे बळ (११)

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

येथील स्त्री गावगाड्यामध्ये पिचलेली असली तरी ती दुर्दम्य आशावादी आहे. शेती व शेतकऱ्यांवर दिवसेंदिवस होणारे वाढते अत्याचार पाहून नवं 'संग्रामशास्त्र' शिकवायची निकड केशव देशमुख मांडतात. आज शेतकऱ्याने हातात काठी व कंबरेला विळा ठेवूनच राहण्याविषयी ते सांगतात.

'गावातली अकरा मुलं वकील झाली तरी
गाव अजूनही कोर्टाच्या झाडाला प्रेतासारखं टांगलेलंच
गावातली सात मुलं पोलीस झाली तरी गावातून
खून - मारामाऱ्यांचा पूर काही ओसरेनाच' (१२)

अशी ही गावची बकाल अवस्था होण्यापाठीमागे जागतिकीकरणाचा हात असल्याचे दिसून येते. आज व्यवस्थेचा 'प्रयत्न' आहे. तो शेतकऱ्याच्या बकाल अवस्थेला सुधारण्याचा - त्यासाठी -

"आता
ढगांना अडवून पाऊस पाडण्यासाठी
त्यांनी टेंडर्स मागवली आहेत
इतकेच काय बहुराष्ट्रीय कंपन्यांनाही
भांडवल गुंतविण्याबाबत आवाहन केलंय नुकतेचं
माननीय राष्ट्रप्रमुखांनी आणि
पाण्याविना शेतीच्या संशोधनात
गुंतले आहेत संशोधक " (१३)

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

उपरोधगर्भ संवादातून चालू परिस्थितीचे व्यंगात्म दर्शन घडवताना नारायण सुमंतांनी वरीलप्रमाणे कविता लिहीली शेतीचे चैतन्य म्हणजे पाणी होय. पण या पाण्यासाठी गावखेड्याची होणारी हालापेष्टा व्यक्त होते. ललित अधाने यांनी शेतकऱ्याच्या पोराची सद्यः स्थिती वर्णन करताना

"शेतकऱ्याच्या पोराला आता
शेतीविषयी आस नाही
गुटखा तंबाखुच्या  नादात
शिक्षणाचा ध्यास नाही" (१४)

१९९०नंतरच्या प्रत्येक गावखेड्यात शेतीबद्दल अनास्था असणाऱ्या तरुणांचे तांडे गावभर फिरु लागले. शिक्षण न घेतल्यामुळे होणारी तगमग 'ना धड  घरका ना घाटका' अशी अवस्था एकीकडे तर दुसरीकडे उच्च शिक्षण घेवून ही नोकरी नसल्यामुळे घुम्यागत बसून राहणाऱ्या मुलाची बापाला असलेली फिकीर प्रतीत होते येथे ' खुंट्यावर टांगलेली दुःख 'मधील ' बबन्याच्या बापाचे मास्तरास पत्र' पाहण्यासारखे आहे.

एकंदरीत "जागतिकीकरणाचा सर्वात जास्त फटका ग्रामीण भागाला बसणारा आहे. हा शहराबाहेरचा भारत शिक्षणात मागे आहे. 'ग्लोबल खेड्यापासून ' तर लाखो मैल दूर आहे. एक तर त्याची जगण्याची साधने कालबध्द  तरी होत आहेत किंवा स्पर्धेत मागे तरी पडत आहेत. ग्रामीण भाग म्हणजे कच्चा माल घेण्याचं ठिकाण झालं आहे. परकीय आणि स्वदेशी कंपन्या तेथील माल ओरबाडून घेत आहेत. परिणामी कधी नव्हे एवढा हा ग्रामीण भाग मागे पडतोय " हे उत्तम कांबळे यांचे मत लक्षात घ्यावे  लागेल. जागतिकीकरण आणि मराठी कविता यांचा संबंध स्पष्ट करतांना प्रस्तावनेत त्यांनी वरील मत नोंदवले आहे.

●●●

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

## संदर्भसूची :

१. देशमुख, सदानंद : 'गावकळा', सुविद्या प्रकाशन, पुणे ,प्र.आ., २००५, पृ.१०

२. देशमुख, सदानंद : गावकळा पृ.१४

३. नारायण ,कुलकर्णी कवठेकर : मागील पानावरुन पुढे सुरु..,. मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ. २००५ पृ.९५

४. पवार, संतोष पद्माकर :पिढीपेस्तर प्यादेमात, पॉप्युलर प्रकाशन,' मुंबई, प.आ.२००८ पृ.११७

५. इंगळे , बालाजी मदनः मेलं नाही अजून आभाळ, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प.आ. २०१० पृ.१५

६. तत्रैव : पृ. ३३

७. खेडेकर, जयरामः मेघवृष्टी, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प.आ.२००५,पृ.१०७

८. पाटील, एकनाथःखुंट्यावर टांगलेली दुःख, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प.आ.२००९पृ.६१

९. तत्रैव :पृ.६२

१०. होळकर, प्रकाशः कोरडे नक्षत्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई प.आ.१९९७ पृ.०४

११. पाटील, प्रदीप : अंतरीचा भेद, अभिधानंतर प्रकाशन मुंबई, प्र. आ. २००२ पृ.१३ व १५

१२. देशमुख, केशव : अथक पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र.आ. २०१०

१३. सुमंत, नारायण : साताबारा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. २००२ पृ.३८

१४. अधाने,ललित : कुणबी बाप, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, दु.आ.२००७ पृ.५४.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani